शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**महोदय/महोदया,**

श्री.वि.वा.शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा दि.२७ फेब्रुवारी हा जन्मदिन "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करण्याबाबतचे मा. उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक:बैठक-२४१३/(प्र.क्र.०४/१७)/समन्वय, दि.२० जानेवारी, २०१७ आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित केले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

कळावे,

आदेशान्वये,

I/C उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 209
दि. 18 FEB 2017

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
वेबसाईट : www.dirhe.org.in E-Mail : mavi.dhepune@gmail.com
फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६११११५३.
क्र.: उशिसं/म.भा.गौ.दि./मवि-१/२०१७/ १९८४ दि. 14 FEB 2017

परिपत्रक

प्रति,
१. सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण.
२. कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.

Shivaji University, Kolhapur
Affiliation/T-
Inward No. 6157
Date 16/02/17

**विषय: दि. २७.२.२०१७ रोजी मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्याबाबत**

संदर्भ: शासनपत्र क्र.: मभादि-२०१६/प्र.क्र.१९१/२०१६/भाषा-३ दि. १९.१.२०१७

संदर्भांकित शासनपत्राच्या विषयानुषंगाने कळविण्यात येते की, दि. २७ फेब्रुवारी, २०१७ या दिवशी मराठी भाषा गौरव दिन समारंभाचे आयोजन करण्यासंदर्भात मा. मंत्री, (मराठी भाषा) यांच्या अध्यक्षतेखाली दि. १३.१.२०१७ रोजी झालेल्या पुर्वतयारी बैठकीमध्ये, मा. मंत्री महोदयांनी उच्च व तंत्रशिक्षण विभागासाठी दिलेल्या सूचना पुढीलप्रमाणे -

१. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांनी महत्वाच्या ऐतिहासिक ठिकाणी/सार्वजनिक मध्यवर्ती ठिकाणी/संबंधित शहरातील मोठे सभागृह किंवा नाटयगृह निश्चित करुन त्या ठिकाणी मराठी भाषेचा प्रवास, भाषेचा विकास आणि भाषा संवर्धन या संकल्पनेवर आधारित नाविन्यपूर्ण कार्यक्रम आयोजित करावा. केवळ संगीत/सांस्कृतिक कार्यक्रम असे असू नये. भाषेची वैशिष्ठये, कविता, भावगीते, नाटयगीते, लोकगीते इ. घटकांचा समावेश असावा.

२. मराठी भाषा गौरव दिनादिवशी "संगणक व महाजालावर मराठी" ही संकल्पना महाविद्यालयांनी राबवावी. सदर दिवसाचे औचित्य साधून प्रसार माध्यमांद्वारे जास्तीत जास्त माहिती मराठी विकिपिडीयावर प्रसिध्द करावी. त्यादृष्टीने महाविद्यालयांनी आपापल्या क्षेत्राकरीता एक निश्चित लक्ष ठरवून ही माहिती प्रसिध्द करण्याचा संकल्प करावा. त्याकरीता विद्यार्थी/शिक्षक यांना प्रशिक्षण देऊन मराठी भाषा गौरव दिनाच्या दिवशी मराठी विकिपिडीयावर वाचकांकरीता उपयुक्त माहिती प्रसिध्द होईल यादृष्टीने कार्यवाही करावी. सर्व क्षेत्रातील नामवंत व्यक्तींनी आपले प्रोफाईल/लेख विकिपिडीयावर टाकावेत.

३. प्रत्येक महाविद्यालयामध्ये मराठी भाषा आणि वाङ्मय मंडळ असावे.

उपरोक्त सूचना आपल्या अधिनस्थ सर्व शासकीय/अशासकीय, अनुदानित/विनाअनुदानित (टप्प्यांवरील)/कायम विनाअनुदानित महाविद्यालयांना कळविण्यात याव्यात. संबंधीत विद्यापीठे व महाविद्यालयांकडून सदर सूचनांचे तंतोतंत पालन व्हावे यासाठी आवश्यक कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१.